अंक २ रा ]

[ वर्ष २९ वें

# "श्री साईलीला"

( त्रैमासिक )



वार्षिक वर्गणी रु. २-४-०

एप्रिल, मे, जून, १९५२

# श्री साईलीला

## श्री साईनाथ प्रसन्न



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदकपार्श्वतो योजनैकम् ।
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्या निशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृन्दैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः ॥

वर्ष २९ ] त्रैमासिक—एप्रिल, मे, जून, १९५२ [ अंक २ रा

## —श्रीसाई—

जिवाला जगण्याला जीवनाची आवश्यकता आहे; आणि तें जितकें शुद्ध व स्वच्छ असेल तितकें बरें. भगवंताचें नाम हेंच जिवाचें जीवन, म्हणजे सिद्धतेची धन्यता किंवा ज्ञानतृप्तीचा ढेंकर ! ज्ञान हें स्वयंभू असून सहज साध्य होण्यासारखें आहे परंतु तें दुर्लभ झालें आहे. कारण तें मिळविण्याचा सहज सोपा, साधा, विनामूल्य नामामृताची मळलेली वाट सोडून, जीव जपतप, योगयाग ह्या आडमार्गानें जात आहे.

द्विमुखी हरणी पाण्यावर आली ।
मुखावीण पाणी प्यालीरे ॥

तशांतलाच हा प्रकार. पाणी मुबलक असलें म्हणजे त्याची किंमत आपणांस कळत नाहीं, पण तें जिवाला जीवपणाला जीवनच आणतें. पाणी नसेल तर तोंडचें पाणी पळून जातें ! त्याप्रमाणें नाम हें जिवाचें जीवनच नव्हे तर सर्वांची उतारपेठ आहे. या उतारपेठेंत कांहीं उतरलें नाहीं असा जगांत पदार्थच नाहीं !

भोजराजाच्या सभेंत म्हणे कोणी नवीन कविता करून आणली तर त्याला बक्षीस मिळे; परंतु सभेंत, एकपाठी द्विपाठी इ० विद्वान असत. कवीनें नवीन करून आणलेली कविता म्हटली रे म्हटली कीं या पाठकांनीं उच्चारून ती जुनी ठरविलीच ! पण त्यालाही एक युक्तिवान कवि मिळाला. ' राजाकडे दहालक्ष कर्ज आहे ' अशा मतलबाची कविता त्यानें करून आणली व राजासमोर म्हटली. जुनी म्हणावी तर कर्ज द्यावें लागणार; नवीन म्हणावी तर बक्षीस द्यावें लागणार, अशी पाठकांस पंचाईत पडली. पण येथें नामांत उतरला नाहीं असा पदार्थच नसल्यानें, तो शोधण्याचा प्रयत्न केल्यास हातच टेकावे लागतील ! सर्व नामें तर नामांत येतातच व नामांत उतरून मग वाणींत येऊन बाहेर व्यक्त होतात. प्रत्यक्ष भगवान सुद्धां चित्तसागरांत, सहस्रमुखी संकल्पशेषाच्या मस्तकाच्या मंचकावर आराम करीत होते ते या नामाच्या उतार पेठेंतच प्रथम आले. तें नाम भक्तांनीं प्राशन केलें तेव्हां भगवान हे भक्तांच्या हृदयांत अवतरले. तेथें देव भक्तांचें ऐक्य झालें, आणि देव मग सांगूं लागले कीं,

मद्भक्ता यत्र गायते ।
तत्र तिष्ठामि नारद ॥

गीतेमध्यें जिवाला ' क्षर ' पुरुष म्हटलें आहे; म्हणजे ज्ञान देहाशीं तादात्म्य करून आपणांस देहाएवढें मानतें तेव्हां त्यास क्षर पुरुष म्हणतात. जेव्हां ज्ञान विश्वाशीं तादात्म्य करून आपणांस विश्वाएवढें मानतें तेव्हां त्यास ' अक्षर ' पुरुष म्हणतात. जेव्हां तेंच ज्ञान स्वस्वरूपामध्यें आपल्या ' क्षर ' व ' अक्षर ' स्वरूपासहीत लीन होतें तेव्हां स्वानंद स्वरूप पुरुषोत्तमाचा उदय होतो. अर्थात् पुरुषोत्तमाचा उदय झाला कीं ' क्षर अक्षर ' पार नाहींसे होतात. पण नामाचें तसें नाहीं. परमात्म्याला–पुरुषोत्तमाला प्रतीतीला आणून आपण नाहींसे न होतां धन्यतेच्या रूपानें शिल्लक राहून पुरुषोत्तमाशीं भक्तिभावानें एक–जीव रहाते.

या मानवदेहांत जिवाला सुखाचा शोध कर्तव्य नसून, ' विसर ' होणें हें आहे. जिवाला सुखाचा आठव ( शोध ), तोंपर्यंत विषय जवळ राहणार ( दुःख ) सुखाचा विसर पडेल त्यावेळेसच जिवाला समाधान लाभेल. सुखाचा विसर म्हणजे आपलेपणा विसरून जाणें. ' आप आपनेकु भूल जाना वो ही निमाज पंच गना ' अर्थात् जिवाला समाधानत्व प्राप्त होण्याकरितां जिवाचें खरें कर्तव्य म्हटलें तर तें श्रीहरीचें–श्रीसाईचें भजन–नामस्मरण होय.

सर्व साधनाच्या साराचें सार हें ' नाम ' आहे. या नामांत ' न मम = ज्ञान ' मनन = उपासना, नमनकर्म अशा ह्या साधन त्रिपुटीचें स्थान आहे.

नामाचें मूळ कोठें आहे ? जेथें नामी तेथेंच नामाचें मूळ. नामी हृदयस्थ आहे. हृदयस्थास ओळखण्याचें ज्ञान ' मोटकें गुरुमुखें उदैजत दिसें ' आणि हृदयीं स्वयंभावि असे ' ( ज्ञाने ९/४९ ) मग परमात्मा व त्याचें ज्ञान जर हृदयच तर नामाचें मूळ हृद-

यांतच. आत्मा स्वयंभू त्याचें नांव स्वयंभू. अर्थात् नामही स्वयंभू होय. जर तें स्वहृदयांत आहे तर त्याला आणण्याकरितां पायपीट नको, केवळ स्मरण म्हणजे जाणणें, व त्याचें भजन म्हणजे सन्निद्ध करणें एवढेंच जिवाचें कर्तव्य आहे.

श्रीसाईलीला त्रैमासिक हें साईनामाचें सार आहे. त्यांत आपल्या गोड अनुभवाचा मसाला घालून तें जास्त रुचकर करणें साईभक्तांच्या हातीं आहे.

—संपादक

---

# —परमार्थप्रपा—

**ईश्वर**—जगाचा धारण करणारा ईश्वर. ब्रह्मदेवाच्या रूपानें जग उत्पन्न करणाराही तोच. विष्णूच्या रूपानें जगाचा प्रतिपाळ करणाराही तोच व रुद्ररूपानें जगाचा संहारकर्ताही तोच; व सत्वरजतमात्मक जी कालसत्ता तिचा काळही तोच.

**जगदुत्पत्ति**—प्राणिमात्रांच्या गुणावस्था विभागाप्रमाणें त्यांची उत्पत्ति, त्यांची स्थिति व त्यांचा प्रलय होत असतो. प्राणिमात्रांच्या चित्रविचित्र ज्या वासना त्यांनींच हें काळसत्तेचें सूत्र गुंफिलेलें आहे व हेंच सूत्र सर्व संसाराचा खेळ खेळवीत आहे. गुणानुसार कर्में घडत असतात व कर्मानुसार प्राणी स्वर्गास जाऊन उत्तरोत्तर महर्लोक, जनलोक, तपोलोक उपभोगून सत्यलोकापर्यंत पोंहोचितात. किंवा तेच पशुपक्षादि स्थावरांत अथवा त्याहूनही खालच्या वृक्षपाषाणादि स्थितींत पोंहोंचून महानरकापर्यंत त्यांचा अधःपातही होतो. सारांश, जें अतिशय लहान व जें अतिशय मोठें व जें दृष्टिगोचर असल्यामुळें नांवरूपास आलें, तें सर्व प्रकृतिपुरुषापासून उत्पन्न झालें असें समजावें व जें अत्यंत सूक्ष्मदर्शक यंत्रानेंही दिसणार नाहीं, त्या निरवयवास सद्वस्तु हें नांव आहे; व ती सद्वस्तु या प्रकृतिपुरुषाची आदि जननी आहे.

**कार्य**—कार्य हें सदैव विकाररुपी असतें. उदा० अलंकार, अलंकार हा सुवर्णाचा बनवावा लागतो म्हणजे ही सुवर्णाची मध्यस्थिति आहे. जी आदि-मध्यें व अंतीं एकरूप असते तिला सत्यवस्तु म्हणतात. म्हणजे सुवर्ण ही सत्यवस्तु आहे. त्याला मध्येंच जें अलंकारत्व आलें तें त्याचें मिथ्यारूप आहे. तो अलंकार आटवला कीं पुन्हां सुवर्ण झालें.

**सत्य व माया**—निद्रेचा अंगिकार केल्यानें जसें एका जिवाचे अनेक वेगवेगळे जीव व पदार्थ बनून एक अजब स्वप्नसृष्टी उत्पन्न होऊन पांच मिनिटांत ब्रह्मांडाची घडामोड होऊन जात असते त्याप्रमाणें प्रकृतीचा अंगिकार केल्यानें एका सद्वस्तूपासून अनेक लोक उत्पन्न होऊन भयंकर घडामोड होत असते. धोतर, शाल, पागोटें वगैरे एका एका तंतूपासून कोट्यावधि पट बनतात. पण पाहूं जातां तितक्या सर्व पटांत एका तंतूवांचून दुसरी सत्य वस्तू कांहींही नसते. सारांश तंतू सत्य व पटमायिक जें आदिमध्य

अवसानीं एक तें सत्य. उदा० काष्टांची बाहुली. नुसत्या काष्टाला कांहीं शोभत नाहीं. पण त्याच काष्टाला नाक, डोळे, कान, हस्तपादादि अवयव करतांच त्यांची बाहुली होऊन त्याला शोभा आली. त्याचप्रमाणें सद्वस्तूला जगदाकार मिळाल्यामुळें या विशाल ब्रह्मांडामुळें शोभा आली आहे.

**माया व ब्रह्म याचा संबंध**—माया ब्रह्माहून वेगळी असूं शकत नाहीं. तिची वाढ ब्रह्माच्याच आधारानें होते व तीच गुणकार्यास वाढविते. ब्रह्म हें मायेचें नियंतें आहे, व म्हणूनच त्याचें अंगीं पुरुषपण आहे व माया ही पुरुषाची प्रिया असून प्रकृति हें तिचें अभिधान आहे. तात्पर्य ब्रह्माहून पुरुष भिन्न नाहीं, शौर्य ही जशी शूराची शक्ती तशीच माया ही ब्रह्माची शक्ती आहे व ती तेथूनच व्यक्त होऊन तेथें चलीत होते. भागवताचे एकादश स्कंधांत स्वतः कृष्ण परमात्मासुद्धां उद्धवास असेंच सांगून राहिले आहेत कीं, काळ व परमात्मा हे परस्पर अभिन्न आहेत व प्रकृति, पुरुष व काळ हीं तिन्हीं एकरूप. मी श्रीकृष्णपरमात्माच आहे. म्हणजे उत्पत्तीपूर्वीं मी पूर्ण ब्रह्म होतों. उत्पत्तीचें आदीकरण मी ब्रह्म आहे व स्थिति काळीं व प्रलयकाळींही मी ब्रह्मच आहे.

**देहाभिमान व संस्कार**—या स्थितीकालालाही मर्यादा आहे. नानाप्रकारचे देहांत जन्म घेणाऱ्या जिवाला तऱ्हेतऱ्हेचे भोग संपादन करून देण्यासाठीं तयार असलेली ही सृष्टी पिता, पुत्र व पौत्र इत्यादि रूपांनीं अविच्छिन्नपणें आपापलीं कामें नियमितपणें अखंड, जशीं आजपर्यंत तशीं यापुढेंही करीतच राहील. पण हें सर्व जोंपर्यंत परमात्म्याचें इक्षण म्हणजे कृपावलोकन आहे तोंपर्यंतच राहील.

विषयाच्या आसक्तीमुळें मनोवृत्ती वासनानिष्ठ होते. आणि असें होतां होतां जन्मादारभ्य ज्याच्यामध्यें मी वास करीत आलों तो देह म्हणजेच माझा आत्मा अशी त्या देहावर एक प्रीति जडते व मग त्याची कांता, त्याचा सुत वगैरे संसार वाढत जाऊन जिवाला त्याचें वेटोळें पडून त्यांतच हा गुरफटून जातो. आपलें सुखदुःख तर आहेच, पण वास्तविक इतर असतां आपलीं म्हणून मानलेल्या पुत्रपौत्रादिकांचा संसारभारही आपणच वाहातों, असा हा देशाभिमान शुद्ध जो शिव त्याला जीवपण आणतो व जन्ममरण वाढवतो व हा संसार ब्रह्मदेवाचें आयुष्य संपेपर्यंत एकसारखा अखंड जो चालतो तो थेट ब्रह्मप्रलयापर्यंत चालतच राहतो. या प्रलयकाळीं सर्व सृष्टीचा संहार होतो.

**प्रलय**—प्रलय तरी काय एक प्रकारचा आहे ? एकाचें नांव नित्यप्रलय, दुसरा दैनंदिन. तिसरा कर्मजन्यप्रलय. या सर्वांहून थोर ब्रह्मप्रलय. या प्रलयांत संसाराचा मागमुसही रहात नाहीं. असें जरी आहे तरी 'कल्पादौ विसृज्याम्यहम्' हें शिवाय आहेच. ब्रह्मप्रलय झाला कीं सृष्टी संपली हें जरी खरें आहे तरी सृष्टीचा समूळ ऱ्हास होत नाहीं. तिचा अगदीं निःशेष नाश झाला असें मात्र होत नाहीं, तर अविद्येच्या पोटीं वासना बीजविलास अत्यंत सूक्ष्मरूपानें असतोंच. उदा. पर्जन्यकाळीं नाना तऱ्हेचीं तृणें पृथ्वीवर उगवतात

व वाढतात; तींच शरत्कालीं पूर्णत्वास येतात. आणि उष्ण काळांत तींच बीज रूपानें पृथ्वींत विलीन होतात; व कोणास व्यक्त रुपानें दिसत नाहींत. त्याचप्रमाणें ब्रह्मप्रलयांतीं वासना बीजरुपानें संसार हा अव्यक्तांत विलीन होतो.

**सद्‌गुरुकृपादृष्टी**—वर परमात्म्याचें ईक्षणाचें म्हणजे कृपावलोकनाचें महात्म्य वर्णन केलेंच आहे. तें जगाच्या व ब्रह्मांडाच्या स्थित्यंतरास जसें लागू आहे तसेंच पिंडीं तेंच ब्रह्मांडीं या न्यायानें साधकास जरूर तें ईक्षण त्याचेंच नांव पूर्ण सद्‌गुरुकृपादृष्टी. ती नसेल तर पिंडवासी जीवाचे ठायीं ब्रह्मज्ञानाचा प्रकाश पडणारच नाहीं.

**संसारभाव**—आणि या ज्ञानाचा पूर्ण प्रकाश पडल्याची खूण म्हणजे संसाराचा किंवा मी तूं पणाचा पूर्ण अभाव. ती स्थिति लाभल्यावर पुढें प्रपंच मिथ्याभूत होतो. ध्रुवमंडळांत किंवा वैकुंठांत वास करण्याची महत्त्वाकांक्षा रहात नाहीं. तेथें देवभक्त भजन नाहीं, सायुज्यतेचें भान नाहीं, अत्यंत प्रलयाची स्थिति ती हिलाच परमनिर्वाण गती म्हणतात. देह पडला कीं हा प्रलय घडला असा कांहींचा कुतर्क आहे. जिवांत जीव असतांनाच ज्याला हा प्राप्त होईल व ज्यांच्या संसारबीजाचें दहन होईल तोच भाग्याचा व तोच सद्गुरुचा खरा बच्चा. ज्याची संपूर्ण अहंमन्यता खुंटेल व निशेष कल्पना तुटेल त्यालाच ही निजात्मता प्राप्त होईल. उत्पत्तीचा जसा उपक्रम आहे तसाच प्रलयालाही अनुक्रम आहे. परमात्म्याचें कृपावलोकनापासून होणारें अनुग्रहाचे अल्प वर्णन आलेंच आहे.

—संपादक

---

# श्रीसाई-प्रभाव

देह हें अखंड सजीव व चालतें बोलतें राऊळ आहे. भक्त जीवनांत देव व संत दोन्हीं असतात. त्याची प्रतीती येणें खरोखर होय. आईच कामधेनु व कल्पतरु असल्यावर लेकराला काय कमी ? लेकराची सर्व काळजी आईलाच. लेकरांनीं हट्ट करावा एवढेंच माहिती आणि आईनें तो पुरवावा. लेकराच्या कल्याणाच्या, प्रियतेच्या सर्व कल्पना आईलाच कराव्या लागतात.

साक्षीत्त्वानें आपण आपल्या आईचें कौतुकच पहात रहावें. काय सांगूं ? जेवढें जेवढें खोल जावें तेवढें तेवढें साईविषयींचें प्रेम वृद्धींगत होत जातें. असो.

(१)

श्री. निलकंठ रामचंद्र सहस्त्रबुद्धे, बाबांचे भक्त, हे पहिल्या खेपेस शिरडीस गेले, त्यावेळेस त्यांच्यापाशीं बाबांनीं १२ रुपये दक्षिणा मागितली, व नंतर कांहीं दिवसांनीं पुनः ८ रुपये दक्षिणा मागून घेतली. त्यापुढें कांहीं दिवसांनीं त्यांचे मित्र रामचंद्र वामन

उर्फ भाऊसाहेब मोडक यांनीं बाबांना देण्यासाठीं तात्यासाहेब नुलकर यांजकडे ५ रु. म
ऑर्डरनें पाठविले. ते त्यांनीं बाबांना देण्यासाठीं सहस्त्रबुद्धे यांजकडे दिले. त्याप्रमाणें ते रुप
त्यांनीं बाबांकडे हजर केले. तेव्हां, "हे पैसे तूंच ठेव, तुला खर्चास लागतील" अ
बाबांनीं सांगितलें. परंतु ते पैसे ठेवून घेणें इष्ट न वाटल्यामुळें आणि खर्चास लागणा
रक्कम जवळ असल्यामुळें, बाबांना तसें सांगून ते बाबांना ५ रुपये देऊं लागले. तेव्हां बाब
परत म्हणाले, "ही रक्कम तुला खर्चास लागेल, सबब ती तुजपाशीं असूं दे" तेव्हां मा
त्यांचा निरुपाय झाला व त्यांनीं ५ रुपये जवळ ठेवून घेतले. नंतर बाबांची आज्ञा घेऊ
ते निघाले. शिरडीहून पुण्यास ते जाणार होते. परंतु अकल्पित कारणानें त्यांना शिर्डीहू
जळगांवास जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळीं त्यांना पांच रुपयांचीच तूट आली, त
भरून काढण्यासाठीं बाबांनीं दिलेले ५ रुपये मोहरबंद पाकिटांत घालून ते एका स्नेह्या
पाशीं देऊन त्या गृहस्थापासून दुसरे ५ रुपये उसने घेतले; व ते जळगांवास गेले; नंत
ते उसने घेतलेले पैसे परत करून मोहोरबंद पाकीट आणविलें.

(२)

श्री. वासुदेव नारायण देसाई, राहणार मुंबई यांच्या मुलींचें लग्न नवसारी मुक्कामी ठरलें. लग्नाप्रित्यर्थ जवळजवळ ४० ते ४५ नातेवाईक जमले. आगगाडींत आतां सगळ्यांच समावेश कसा होणार ? त्यांत लहान अर्भकांसह कित्येकजण होते. श्री. देसाई टी. सी. ला भेटले व त्यांनीं रिझर्व्हेशन करण्यास विनंति केली; परंतु 'गाडी सुटण्याच्यावेळीं रिझर्व्हेशन होत नाहीं व मला कांहीं करतां येत नाहीं, आपण स्टेशन-मास्तरना भेटा.' असें टी. सी. नें सांगितलें. देसाईंना काळजी पडली कीं एवढी मंडळी जाते कशी व लग्न घटिका साधते कशी ? त्यांनीं श्रीसाईला नारळ ठेवून 'मी लग्नाला जात आहें तरी सर्व सांभाळ करावा' असें निघतांना सांगितलें होतें. त्यांना प्लॅटफॉर्मवर साईमाऊली आठवली व त्यांनीं धांवा केला 'हे प्रभो श्रीसाईबाबा, मला तुमच्याशिवाय कोण ? आतां माझा सांभाळ करणें तुमच्याच हातीं !' असें म्हणतात तोंच हेड टी. सी. तेथें आले. त्यांना देसाईंनीं सर्व हकीगत सांगितली. ते म्हणाले कीं 'हा डबा बडोद्यापर्यंत रिकामा जाणार आहे कारण बडोद्याला तो सबंध डबा रिझर्व झाला होता. तरी तुम्हीं या डब्यांतून जा. त्याप्रमाणें ती सर्व मंडळी त्या डब्यांत बसली. सर्व डबा ह्या मंडळीस मोकळा मिळाला. गाडी सुरू झाली. घोलवड स्टेशनवर एक फकीर डब्यांत येऊन, बाबा मांडीवर मांडी ठेवून दगडावर बसले आहेत-त्या पोजमध्यें बसला. इतक्यांत देसाईंनीं त्यांना पाहिलें व जवळ आले. फकिरानें त्यांना विचारलें, 'काय, सर्व सोय लागली ना ?' देसाई म्हणाले, 'होय.' 'अल्लामियाची करणीच तशी आहे.' असें म्हणून तो फकीर डब्यांतून एकदम उतरून गेला. लग्न निर्विघ्नपणें पार पडलें व सर्व मंडळींसह परत देसाई मुंबईस आले. रा. रा. देसाई यांचा हा अनुभव ऐकून मनाला तर आनंद झाला व बाबांच्या लीलेचा महिमा आमच्यासारख्यांना वर्णन करण्यास शब्दच नाहींत.

(४)

एक जुना अनुभव आठवला तो मी आपणांस सादर करीत आहें. तो अवश्य मनन करावा.

ह. भ. प. माधवबुवा बडोदेकर यांचा संकल्प असा होता कीं, संतांची भेट, भाऊसाहेब दीक्षित यांच्यासमागमें व्हावी असा होता. पण संगमनेरहून निघतांना शिर्डींत भाऊसाहेब नसावेत अशी त्यांची खात्री होती. म्हणून ते जे टांग्यांतून उतरले ते एकटेच दर्शनार्थ मशिदींत गेले. तेथें त्यांचे आधींच भाऊसाहेब बाबांचेपाशीं बसलेले पाहून त्यांस जो आनंद झाला तो अवर्णनीय आहे. असो, माधवबुवा बाबांचे पाया पडून जवळ बसल्यावर परमहंसांचीं लक्षणें काय तीं बाबा आपल्यास सांगतील काय असें त्यांच्या मनांत आलें मात्र तोंच 'वाड्यांत जा व पोथीबिथी वाचा' म्हणून भाऊसाहेबांस बाबांची आज्ञा झाली. भाऊसाहेब नमस्कार करून उठले त्यासरसे माधवबुवाही आज्ञा घेऊन उठले. वाड्यांत जाऊन भाऊसाहेबांनीं एकनाथी भागवत पोथी वाचण्यास सुरवात केली. इतर श्रोतेमंडळीबरोबर माधवबुवाही ऐकावयास बसले. सांगावयाची गोष्ट इतकीच कीं, भाऊसाहेबांचा पूर्वींचा कोणताही संकल्प नसतां अगर माधवबुवांनीं बाबांस मनांतले मनांत केलेली प्रार्थना भाऊसाहेबांस आधीं कळविली नसूनही, नित्यक्रमानुसार आदले दिवशीं ज्या जागीं पोथीचा विषय संपला होता, तेथून पुढें वाचण्यास आरंभ झाला; तो अध्याय १८ मधील २७ श्लोकापासून झाला; आणि या भागवताच्या एकादश स्कंधाच्या या अध्यायाच्या २७ श्लोकापासून ३६ पर्यंत एकनाथ महाराजांच्या टीकेंत हंस व परमहंसांचीं लक्षणें व धर्म याचेंच सुश्राव्य विवेचन माधवबुवांस ऐकावयास मिळालें. तें ऐकून त्यांना बाबांबद्दल केवढें प्रेम उत्पन्न झालें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी.

माधवबुवांस कोपरगांवीं लवकर जाण्याची आज्ञा झाली असून टांग्यांतून निघावयास थोडा अवकाश लागला आणि टांगा शिर्डी सोडून सुमारें एक मैल गेला असेल; माधवबुवा टांग्याच्या मागील बाजूस बसलेले होते; आणि एकाएकीं धूमधार पाऊस सुरू झाला. बुवांचे अंगांतील कपडे बहुतेक भिजले व आतां अजून १० मैल रस्ता छाटावयाचा आहे. तो सुखानें कसा छाटला जाईल ही मोठी काळजी उत्पन्न झाली; तेव्हां "बाबा आतां मला जसे सुखानें घरून दर्शनास आणलेंत तसेंच सुखरूपपणें घरीं नेऊन घाला" अशी मोठ्या आनंदानें व भक्तीभावानें बुवांनीं प्रार्थना केली. आणि पुढील सर्व प्रवासांत पाऊस तर पडतच होता पण नवल हें कीं बुवांचे कपड्यावर किंवा अंगावर ते स्टेशनवर पोहोंचून आगगाडींत बसेपर्यंत पाण्याचा एक थेंबही पडला नाहीं. अशी बाबांची लीला अगाध आहे.

# —बाबांची बोधपद्धति—

एकदां बाबा नानास म्हणाले, "सर्व षड्रीपूंत जिंकण्यास सोपा विकार कोणता ?" नानांनीं सांगितलें, "मला माहीत नाहीं" तेव्हां बाबा म्हणाले, अरे "**मत्सर**" "हा विकार जिंकण्यास सर्वांत सोपा. यांत आपलें नफा नुकसान कांहीं नाहीं. मत्सर म्हणजे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नाहीं. आपण त्याची निंदा कुचेष्टा करतों. दुसऱ्यास ऐश्वर्य प्राप्त झालें तर आपलें त्यांत काय नुकसान आहे ? उलट आपण आनंद मानावा व हवें तर आपणही तसें ऐश्वर्य मिळवूं अशी हिंमत धरावी आणि नेटानें प्रयत्न करावा, पण इतरांचा उत्कर्ष झाला म्हणून आपण विषाद मानूं नये."

'प्राण्या बोलावें बहु गोड, पण खरें"

बाबांनीं नानाला एकदां असा धडा दिला कीं, सार्वजनिक कामासाठीं कोणी कांहीं आपले जवळ मागूं लागला तर आपणांस कांहीं मदत येण्याजोगी असेल तर अवश्य करावी. तशी मदत करतां येत नसेल किंवा इच्छा नसेल तर तसें स्पष्ट गोड शब्दांत सांगावें. उपहास अगर थट्टा करूं नये किंवा रागावूं नये' नाना म्हणाले कीं, हें मी ध्यानांत ठेवीन आणि त्याप्रमाणें वागेन' बाबा म्हणाले, 'हा धडा जितका सोपा दिसतो तसा नसून आचरण्यास कठीण आहे' तेव्हां नानांनीं सांगितलें, 'हा धडा मी लक्षांत ठेवून आचरणांत आणीन.'

नाना कोपरगांवीं शिरडीच्या रस्त्यावर असणाऱ्या श्रीदत्तमंदिरांत दर्शन घेण्यासाठीं नेहमीं जात. त्या मंदिरांत राहणारे बोवा गरीब व सालस होते. त्यांचा व नानांचा परिचय झाला. पुढें कांहीं दिवसांनीं, नानासाहेब हे मोठे उदार व भाविक आहेत अशा समजुतीनें त्या बोवांनीं त्यांच्याजवळ अशी एक गोष्ट काढली कीं, या दत्तमंदिरासमोरील नदीवर घांट बांधून घ्यावा. घांट बांधल्यास लोकांची धुण्याची व स्नानसध्येची सोय होईल आणि हें श्रेय नानासाहेबांनीं घ्यावें. हें काम आपल्या आंवाक्याबाहेरचें आहे असें नानांनीं सांगितलें. वरचेवर बुवा या कामाविषयीं नानास सांगत पण नानासाहेब कांहीं कबूल करीत नसत. पुढें पुढें बोवांच्या नेहमींच्या विनवण्यास नकार देणें नानासाहेबांस जड जाऊं लागलें. आणि त्यांनीं सांगितलें कीं, 'सर्व घांट बांधून घेणें तर हजारों रुपये लागतील व तशी तजवीज होणें शक्य नाहीं, पण मंदिराच्या रुंदीइतकाच दहावीस पायऱ्यांचा घांट बांधणेस अजमासें ३०० रुपये लागतील आणि तो मी खर्च करूं शकेन. 'इतकें झालें तरी पुष्कळ काम होईल' असें बुवांनीं सांगितलें. याप्रमाणें दोघांचें भाषण होऊन नानासाहेब नगरास गेले.

पुढें कांहीं दिवसांनीं आपले साडू बिनिवाले यांना घेऊन नानासाहेब बाबांच्या दर्शनास निघाले. थोडीशी रात्र असतांच ते कोपरगांवीं आले; तेव्हां नानासाहेबांच्या मनांत आलें कीं, दत्तदर्शनासाठीं आपण मंदिरांत गेलों तर बोवा आपलेपाशीं ३०० रुपये मागतील तर ते आपण बरोबर आणले नाहींत किंवा त्याबाबत आपण कांहीं व्यवस्थाही केली नाहीं तेव्हां काय करावें ? इतक्यांत त्यांना एक युक्ती सुचली

कीं, या खेपेस मंदिरावरून न जातां, दुसऱ्या मार्गानें शिरडीस जावें. ही युक्ती बिनिवाल्यांस पटली. शौच–मुखमार्जनासाठीं आडवाटेनें गेले असतां त्यांच्या अंगांत बाभळीचे निवडुंगाचे कांटे बोंचले. त्यामुळें त्यांना बराच त्रास झाला. आणि वाटेने बरेच हाल झाले. पुढें ते शिरडीस आले आणि बाबांच्या दर्शनास गेले तेव्हां बाबा त्यांच्यावर बरेच रुसले व रागावले आणि त्यांच्याशीं बोलण्याचेंही टाळलें. त्या अबोल्याचें कारण विचारतां बाबा म्हणाले, "अरे नाना, बोवा तीनशें रुपये मागेल म्हणून तूं सरकारचें (दत्ताचें) दर्शन टाळलेंस व आडमार्गानें आलास. अशा रीतीनें मी घालून दिलेला धडा आचरणांत आणतोस काय ? तूं रुपये आणले नव्हतेस किंवा त्याची सोय तुझ्याकडून झाली नव्हती तर तो बुवा तुला खाता काय ? पैशांची सोय झाली नाहीं असें स्पष्ट सांगावयाचें सोडून सरकार दर्शन टाळून आडमार्गानें यावयाची ही युक्ती कोठची ? पायांत व अंगांत कांटे शिरून प्रायश्चित्त मिळालें कीं नाहीं ? अशा मनुष्याशीं आपण कां बोलावें ?"

बाबांच्या सर्वसाक्षीत्त्वाबद्दल कौतुक वाटून नानांनीं आपली चूक कबूल केली आणि पुन्हां आपण असें करणार नाहीं असें बोलून त्यांनीं बाबांस वंदन केलें. बाबांनींहि त्यांना उदार अंतःकरणानें क्षमा करून याच्यापुढें तरी असें करूं नको म्हणून सांगितलें.

—संपादक

# —अर्क–मंदार—

श्रीसाईलीला त्रैमासिकाच्या अंकांत साईलीला वर्णन करण्याऐवजीं, अर्कमंदाराची माहिती दिली म्हणून परम साईभक्त माझ्यावर रागावतील; पण हीसुद्धां श्रीसाईचीच लीला व अगाध महिमा आहे. श्रीसाई हे कोण ? हे आमच्यासारख्या पामराला कळत नाहीं. त्यामुळें भ्रमानें आम्हीं त्यांना आमच्यांत गणतों म्हणून हा अज्ञानाचा खेळ सर्वत्र चालला आहे. श्रीसाईच्या चरित्रावरून (कै. श्री. दाभोळकरकृत) श्रीसाईबाबांनीं, आपल्या भक्तांना, त्या त्या देवतांचे (राम, मारुती, गणपती) दर्शन दिलें आहे. अर्थात् ही गोष्ट योनीज प्राण्याला अशक्य आहे. अर्थात् अयोनीज म्हणजे 'नाथ' करूं शकतात. बाबा हे आदिनाथ (श्रीशंकराचे अवतार) आहेत आणि रामभक्त आहेत हें त्यांच्या रामनवमी उत्सवावरून सिद्ध होतें व शंकरसुद्धां रामभक्त होते.

कै. दाभोळकर (श्रीसाईचरित्र लेखक) यांना जसें शिमग्याच्या दिवशीं बाबांनीं स्वतः जाऊन वांद्रें मुक्कामीं पुरणपोळीभोजन घेतलें. तसेंच एका वरदचतुर्थीला त्यांना गणेशाचें रूप दाखविलें व पोळी मागून घेतली. त्यावेळेस ते शिरडीस आले त्यावेळेस 'काय अण्णा, वांकडतोंड्या (वक्रतुंड) भेटला ना ?' अण्णा म्हणाले, 'हो बाबा, हे आपलेच खेळ आहेत.' त्यावेळीं माधवराव देशपांडे (शाम्या) तेथें हजर होते ते म्हणाले, 'ह्या देवाचा खेळ कांहीं न्यारा आहे. देवा ! तुवांच खेळ करावें आणि आम्हांस विचारावें ? देवा कलियुगांत गणेश भेटतो कारे ?'

बाबा–हो, भेटतो.

शाम्या–कुठें ?



बाबा-आंकड्यांच्या झाडापाशीं ( रुई )

( ही गोष्ट माधवरावांनीं मला स्वतः १९३४ सालीं सांगितलेली आहे )

या गोष्टीवरून बाबांनीं सांगितलेलें आंकड्याचें झाड म्हणजे रुई ( तांबडी वा पांढरी ) व भक्तिभावानें त्याची पूजा अर्चा केली तर श्रीगणेश त्या झाडाच्या मुळांत

प्रतीत होतो हें दर्शविलें व त्याप्रमाणें माझ्या अनुभवांत आलेला असा हा मंदार–अर्क-मंदार वृक्षाची ( फोटो दिला आहे ) माहिती द्यावी म्हणजे सर्व भक्तांना माझ्या देवाची, श्रीसाई–गणेशाची महति कळेल.

---

# श्वेतार्क व अर्कमंदार यांचें लक्षण व महति

अर्क मंदार पुष्पाणि श्वेतरक्तादि भेदतः ।
वर्णाढ्यानि भविष्यंति मम प्रीतिकराणि च ॥
केवलं श्वेतवर्णानि श्वेतार्कपुष्पकाणि च ।
पुष्पभेदो द्वयोश्चास्ति न भेदो वृक्षकेद्विज ॥
अर्कमंदारवृक्षस्तु श्वेतार्कदपिचोत्तमः ।
मंदारार्कैकरूपोऽयमर्क मंदार वृक्षकः ॥
मंदारेति च नाम्नाऽपि श्वेतार्कश्चेति नामतः ।
अर्कमंदार इति च लोकेषु कथितो भवेत् ॥

**भावार्थः**—अर्कमंदार वृक्षाचीं फुलें पांढरीं व तांबडीं, अशा दोन्हीं प्रकारचीं असतील ! तीं दोन्हींहीं मला प्रियच आहेत ! अर्थात् अशीं दोन प्रकारचीं फुलें काल-भेदानें किंवा क्षेत्रभेदानें, ज्या वृक्षाला येतील तो अर्कमंदार समजावयाचा असून, केवळ पांढरींच फुलें येतील; तो **श्वेतार्क** म्हणावा. हा वेगळेपणा फक्त फुलांतच दिसून येईल ! वृक्षामध्यें नाहीं ! तथापि श्वेतार्कापेक्षां, अर्कमंदार वृक्ष व त्याची पुष्पेंच मला अधिक प्रिय आहेत ! कां कीं श्वेतार्क व मंदार या दोघांची एकरूपता अतएव मंदार संज्ञेची पूर्णार्थता, या अर्कमंदाराच्याच ठिकाणीं दिसून येते ! सारांश मंदार श्वेतार्क आणि अर्क मंदार, अशा तिन्हीं नांवांनीं या एकाच वृक्षाची प्रसिद्धी सर्वत्र होईल असें समजावें.

सारांश मंदार नांवानें प्रसिद्ध असलेल्या श्वेतार्क वृक्षाला, जशीं पांढरीं फुलें येतात; तशीं क्वचित् तांबूस रंगाचीं फुलें येत असल्याचें आढळून येतें ( मोरगांव व थेऊर ह्या ठिकाणीं तांबूस रंगांचीं फुलें आहेत ) पण वरील शास्त्रीय स्वरूप न कळल्यामुळें त्या रंगाचीं फुलें येणारा वृक्ष मंदार न मानतां रुईच समजून, त्याचीं फुलें गणेशाला अर्पण करींत नाहींत ! पण तसें करणें योग्य नव्हे. दोन्हीं रंगाच्या फुलांचा वृक्ष एकरूपच आहे; व तो गणेशप्रिय मंदारच आहे. इतकेंच नव्हे तर क्वचित् पांढरीं फुलें येणाऱ्या मंदारालाच पुढें तांबूस रंगाचीं फुलें येतात; तर श्वेतार्कांच्या बीजापासून झालेल्या वृक्षालाही तांबडी फुलें येतात; अथवा तांबड्या फुलांच्या वृक्षाचें बीज पेरून येणाऱ्या वृक्षाला पांढरीं फुलें येतात असें प्रत्ययास येतें. यावरून दोहोंचें एकरूप प्रतीत होतें यांत संशय नाहीं.

शमी मंदाराचें वृक्षरूपोद्भवन ।
चतुर्विधमिदं विश्वमुपसहृत्य विघ्नपः ॥
स्वात्मन्येव बिंदुमये स्वानंदसंज्ञके वरे ।
ननर्तानंद सयुक्तो नाना खेलकरः प्रभु ।
आनंदाश्रूणि नेत्रेभ्यः पतितानि द्विजोत्तमः ।
वृक्षत्रय स्वरूपेण जातानि तानि सत्तमः ।
स्वानंदरुप युक्तानि तत्रैव संस्थितानिच ॥

कोण्या एका वैनायक महाकल्पाच्या शेवटीं, जणूं स्वेच्छालीला विलासाचा उपसंहार करावा; अशा इच्छेनें श्रीस्वानंदेशप्रभूनीं चतुर्विध विश्वरूपा माया आवरून घेतली तेव्हां व्याकृताव्याकृतादि समस्त भावांचा लय होऊन, सर्वत्र स्वसंवेद्यसत्तामयीं बिन्दुमायाच एक ओतप्रोतशी भरून राहिली; त्यावेळीं, योगनिद्रास्थित होण्यापूर्वी, जणूं स्वानंदमायाविलास संपवून पूर्णपणें कृतार्थ वा तृप्त झाल्याचा भाव दर्शविणारें, असें नृत्य प्रभूंनीं केलें. त्याचा परिणाम म्हणजे, त्या नृत्यानंदाचा अनुभव, त्यांच्या नेत्रावाटे अश्रूंच्या रूपानें बाहेर पडला. सारांश, श्री स्वानंदेशाच्या जे स्वानंदानुभूति-सूचक अश्रू गळाले; त्यांपासून तीन प्रकारचे वृक्ष उत्पन्न झाले व स्वसंवद्यसत्तात्मकशा दिव्यरूपानें ते स्वानंदलोकामध्यें राहिले

वामनेत्रसमुद्भूतो वृक्षो ब्रह्मास्वरूपवान् ।
प्रकृत्यात्मक इति च बिंदुब्रह्मात्मकः स्मृतः ॥
चतुर्विधशांतिमयं शमीति परिकीर्तित ।
दाक्षिण्णाच्च समुद्भूतो मंदार इति कथ्यते ॥
स एव निर्गुणः प्रोक्तः सोहंमात्रात्मकोमतः ।
मध्यनेत्रात्समुदभूतो द्विभेदपरिवर्जितः ।
स्वानन्दात्मक इति च कथ्यते वेदपारगैः ।
श्वेतार्कश्चार्कमंदार इति नाम्ना स उच्यते ।
असदब्रह्म मयं ब्रह्म स्वास्मिन प्रकृतिरूपकं
स्वानंदे सत्स्वरूपं स्यानिर्गुणं पुरुषात्मकं ।
त्रिविधं द्विविधं जातं स्वानंदे वृक्षरुपं ॥

गणेशाच्या डाव्या डोळ्यांतून अश्रू गळाले, त्याच्यापासून ब्रह्मस्वरूप वृक्ष झाला. तो प्रकृत्यात्मक समजावा. कारण ‘ वामागं प्रकृत्याकारं । ’ व न्यायानें वामभाग प्रकृतिरूप ठरलेला आहे. अर्थात हें प्रकृत्यात्मकत्व बिंदुब्रह्मात्मकच ठरलेलें असल्यानें आखिल चतुर्विध-त्वाची शांति करणारी ती शमी अशा अर्थी तो वृक्ष शमी संज्ञेनें संपन्न झाला. तसेंच ‘ दाक्षिणागं

तु पुंमयं । ' म्हणजे दक्षिणभाग पुरुषात्मक समजावें. या न्यायानें उजव्या डोळ्यांतून गळलेल्या अश्रूपासून उत्पन्न झालेला ब्रह्मस्वरूपी दिव्यवृक्ष पुरुषात्मक समजावयाचा आहे. अर्थात् ही पुरुषात्मकता पूर्ण अर्थानें सर्वथा निर्गुण व बिंदुरूप प्रकृतीच्या ठिकाणीं सोहं मात्रात्वानें प्रत्ययास येणार अशीच असल्यानें तदर्थसूचक मंदार नांवानें तो स्तविला गेला आहे. आणि मध्य नेत्रांतून गळलेल्या अश्रूपासून उत्पन्न झालेला वृक्ष जो सगुण निर्गुणादि पृथक् भावांनीं रहित अर्थी प्रकृतिपुरुषाहून पर, अशा स्वानंदात्मक सत्तेनें संपन्न ठरलेला आहे; तशाच स्वरूपानें तो जाणावयाचा आहे. श्वेतार्क अथवा अर्कमंदार अशाच नांवानें त्याची प्रशस्ती वेदांनीं गाईली आहे.

' दुष्टं वारयतीति दूर्वा '
' सर्वं शमयतीति शमी
' मां दारयतीति मांदारः'

## वरदान प्रशस्ति

स्वानंदरुपिणो वृक्षा गणेश तोषणायच ।
जगत्यास्मिन् वृक्षरुपाः सजाता योगवैभवात् ॥
तपसा तोषयामासुः स्वानंदेशं गजाननं ॥

स्वानंद लोकांमध्यें स्वसंवेद्यज्योतिः रूपानें असलेले हे तीनही वृक्ष गणेशाच्या संतोषासाठीं, या मर्त्य लोकांमध्यें येऊन योगबलानें प्राकृत वृक्षरूपाला धारणकर्ते झाले; आणि पूर्ण कृतार्थता मिळविण्यासाठीं गणेशाचें आराधन करूं लागले.

स्वानंदाख्यार्कवृक्षस्य प्रादुरासीद गजाननः ।
पुरतस्तमयथो वीक्ष्य प्रावदत् गणनायकः ।
सत् स्वानंदस्वरुपी त्वं साक्षादात्माको मतः ।
त्वं श्वेतवर्ण युक्तत्वात् श्वेतार्क इति कथ्यसे ।
विद्यापादे निर्गुणस्त्वं स्वानंदे सत्स्वरुपवान् ।
एक एव द्विधा त्वं तु पादभेदेन कथ्यसे ।
विद्यापादे तु मंदरः श्वेतार्क स्वस्वरूपके ।
अतस्ते वृक्षमूलेऽहं वसामि पूर्णभावतः ॥
अर्कमंदार इति च नाम्ना ख्यातो भवाधुना ।
अर्कमंदार-कुसुमैः पूजयिण्यंति गाणपः ॥
शम्या अपि प्रियतरो भव त्वं मम सत्तम ।
तव मूलसमुद्भूतान धारयिष्यंति गाणपः ॥

मणीस्तेति प्रियतराः शमी जातन्न संशय. ।
तत्र मूलाच्च मे मूर्तिं कृत्वा ये पूजयंति मां ॥
गाणेशा योगमार्गस्थाः वेदमार्ग परायणाः ।
मत्तुल्यतां प्रदास्यामि तेभ्यः सत्यं न संशयः ॥
आविर्भूव च ते मूलात्तव पुत्रो भवाम्य हं ।
मंदारमपि संवीक्ष्य प्रावदत् गणनायकः ॥
पद्मादि सर्वपुष्पेभ्यस्तव पुष्पं प्रियं मम ।
आविर्भूयच ते वृक्षात्तवपुत्रौ भवाम्यहं ॥
स्वर्गलोकादि लोकेषु मान्यो भव मदाज्ञया ।
एवं दत्वा वरान्देवः पिदधे गणनायकः ॥"

(श्रीविनायक रहस्थे. लीलामृतकांडे अ. २१)

स्वानंदसंज्ञक अर्कमंदारवृक्षापुढें ते श्रीगणराजप्रभु प्रगट झाले; आणि अनुग्रहवाणीनें त्याला म्हणाले; 'सत्स्वसंवेद्याशधारी साक्षादात्मा जो सूर्य, तदात्मकत्वानेंच तुझी प्रतिष्ठा आहे; आणि स्वरूपानेंहीं तूं श्वेतवर्ण आहेस ! म्हणून श्वेतार्क नांवानें तूं प्रसिद्ध होशील अर्थात् हें तुझें स्वानंदपादस्थ स्वरूप असून, निर्गुण महिम्यानें संपन्न असा तूं, विद्यापादामध्येंहीं प्रतिष्टित आहेस ! त्या स्वरूपामध्यें तूं मंदार नांवानें प्रसिद्ध होशील. सारांश एकरूपच असलेला तूं भिन्न पादाश्रयामुळें द्विविध रूपानें व दोन नांवानीं तुझी प्रसिद्धी व प्रतिष्ठा, वेदास्तुत् व लोकविख्यातशी राहील. तस्मात् निर्गुण—पूर्णतासूचक व निर्गुण प्रचाररूप, असाच तुझा महिमा ठरलेला असल्यानें, तदतीव असा पूर्ण स्वसंवेद्या महिमाधारी, मी स्वानंदेश, तुझ्या मूलाच्या ठिकाणीं, संपूर्ण स्वरूपानें अंखड राहीन ! हें सत्य समज ! सारांश तुझ्या द्विविधत्वाची पूर्णता सुचविणारी **अर्कमंदार** ही विशेषार्थक संज्ञा तुला प्राप्त होईल. शमीपत्रापेक्षांसुद्धां तुझी पुष्पें मला अतिशय प्रिय होतील ! तुझ्या मूळाचे मणी करून वैदिकमार्गी गणेशभक्त योगी वगैरे, यथाशास्त्ररित्या धारण करतील. त्यांना मत्तुल्याताच देईन यांत संशय नको ! तुझ्या मूलापासून मी एक अवतार धारण करीन व तुझा पुत्र म्हणून प्रसिद्ध होईन !" इत्यादि वरदान श्वेतार्क स्वरूपाला उद्देशून दिलें व तसाच अनुग्रह मंदार स्वरूपावरही केला. विशेषतः मंदाराची मान्यता स्वर्गलोकांमध्यें राहील; आणि पद्मादि सर्व पुष्पांहून त्याचींच पुष्पें अधिक प्रिय होतील ! इत्यादि सांगून **श्वेतार्कमंदारवरद** प्रभू श्री **श्वेतार्कगणेश** अंतर्हित झाले.

# —शमी-मंदारवरदान कथा—

पूर्व काळीं और्व नामक मूनी होऊन गेले. ते परम धर्मनिष्ठ, स्वधर्मपरायण व मोठे गाणेश होते. त्यांच्या पत्नीचें नांव सुशीला असून, तीहि परम साध्वी, धर्मनिष्ठ पतिव्रता होती. त्या उभयतांना एक मुलगी झाली. तिचें नांव शमी असें ठेविलें. बालपणापासून ती विशेष संस्कारिणी दिसत होती. (तयोः कालेन संजाता पुत्री तेजस्विनी प्रभो। तस्या नाम द्विजौ तौ तु शमीकेति प्रचक्रतुः) (श्री मौद्गुल पु. खं. ५ अ. २५)

ती सात वर्षांची झाली तेव्हां और्वमुनि वरसंशोधनाकरतां निघाले; ते शौनक मुनींच्या आश्रमामध्यें आले. तेथें धौम्य मुनींचा पुत्र मंदारनामा, विद्याध्ययनासाठीं राहिला होता. त्यालाच आपला जामात करावा असें और्व मुनींनीं ठरविलें. शौनक मुनींचा विचार घेतला आणि धौम्यांकडे जाऊन त्यांचीही सम्मती घेतली. नंतर थोडक्याच कालांत शुभ मुहूर्त पाहून, और्व मुनीनें त्या सर्व मंडळींना आपल्या घरीं बोलावून आणिलें. आणि मोठ्या सत्कारसमारंभानें व यथोक्त विधीला अनुसरून, आपली कन्या शमी, धौम्य मुनींचा जो पुत्र मंदार त्याला दिली. सर्व मंडळी आपापल्या घरीं निघून गेली. 'पुनर्गते कियत्काले यौवनस्थां विभाव्य तां। शमिकां स समानेतु मदार प्रयथां स्वयं ॥' कांहीं कालानंतर शमी तारुण्यांत आल्याचें जाणून तिला नेण्याकरतां स्वतः मंदार और्व मूनींच्या आश्रमांत आला. मुनीनें त्याचा सत्कार करून मोठ्या समारंभानें, शमीला त्याच्या स्वाधीन केली; आणि त्या उभयतांची पाठवणी केली.

उभयतां पतीपत्नी शमीमंदार मार्गानें जात असतां, श्रीभ्रुशुंडी महाराजांचा आश्रम त्यांना लागला. तेथेंच विश्रांतीसाठीं ते राहिले. त्यावेळीं श्रीभ्रुशुंडी महाराज आश्रमांत नव्हते. बाहेर गेले होते. थोड्या वेळानें

'स्वस्वाश्रमविहारार्थं भ्रुशुंडी संगतो ऽभवत्।
तं दृष्ट्वा शुंड्यायुक्तं जहजतुश्च मुर्खवत् ॥'

ते महागाणपत मुनीश्रेष्ठ आपल्या आश्रमामध्यें परत आले. शुंडाधुंडधारी असें त्यांचें स्वरूप पाहून, त्यामधील तात्पर्यार्थ व त्यांचें महात्म्य न कळल्यानें शमीमंदारांना हंसू आलें. पण तोच त्यांच्या पूर्वदोषांचा परिपाक ठरला.

शुंडया अपमानेन पापं प्राप्तं महाद्भुतं।
तेन संप्रेरितो योगी चुकोप रक्तलोचनः ॥

शुंडेचा अपमान म्हणजे साक्षात् गणेशस्वरूपाचाच अपमान तो! अज्ञानामुळें कां घडेना पण तें पाप अमोघफल देणारेंच ठरलेलें! अर्थात त्यामुळें, म्हणजे त्या शमी-मंदाराकडून घडलेल्या दोषांच्या योगानेंच, जणूं प्रेरणा केलेले ते मुनीश्रेष्ठ अत्यंत क्रुद्ध झाले. 'उवाच तौ महायोगी भ्रूशुंडी च द्विजाधमौ। दृष्ट्वा जसतः शुंडां पादपौ

भवतं रूपा ॥ " मोठ्या रागारागानेंच, ते त्या उभयतां दंपतीला म्हणाले, " मूर्खांनों ! प्रभुप्रसादानेंच प्राप्त असलेल्या शुंडेला पाहून हंसलांत. प्रभुप्रसादाचा उपहास हा, मोठा अपमानच ठरला ! ज्याअर्थी अत्यंत मूढपणामुळेंच, तुमच्याकडून तो घडला त्याअर्थी मूढयोनीची प्राप्ती तुम्हांस होईल ! तुम्हीं दोघेंही वृक्षरूप व्हाल हें सत्य समजा. कां कीं– " शुंड्या अपमानं य करिष्यति नराधमः । स मे शत्रुर्नसंदे हो गजास्यस्यावमानतः ॥ " शुंडेचा अपमान करणारा कोणीही असो, तो अधम पुरुष प्रत्यक्ष गणेशाचाच अपमान करणारा असल्यामुळें माझा शत्रूच ठरत असून, त्याची ती कृति, श्री गणेशराजप्रभूचा परमभक्त असलेल्या मला सहन कशी होणार ?

शौनकमुनींचा शिष्य मंदार आपल्या भार्येला आणण्यासाठीं श्वशुरगृहीं गेला. त्यास एक महिना होऊन गेला तरी तो अजून कसा आला नाहीं, अशी चिंता उत्पन्न झाल्यानें शौनकमुनी आपल्या शिष्यगणासमवेत त्याच्या शोधासाठीं और्वमुनीकडे आले, आणि त्यांना म्हणाले, ' शमीला आणण्यासाठीं मंदारास पाठविलें; तो अजून आला नाहीं तर तो आहे कुठें ? ' त्यावर और्वमुनींना मोठें आश्चर्य वाटून दुःख झालें. ते म्हणाले, ' दत्वा कन्या मया सद्यः प्रेषितश्च त्वदंतिके । त्याचवेळीं शमीला बरोबर देऊन, मी त्या दोघांची पाठवणी केली.' मग ते दोघे गेले कुठें ? त्या मंडळीस मोठी चिंता पडली व ती मंडळी त्यांच्या शोधाकरतां निघाली. पहातां पहातां ती मंडळी श्रीभ्रूशुंडीमहाराजांच्या आश्रमांत आली. तेथें दोन वृक्ष मात्र अपूर्व दिसत होते. तेव्हां शौनक मुनींनीं प्रणिधान केलें. त्याबरोबर त्यांना कळून आलें कीं, श्रीभ्रूशुंडीमहाराजांचा अपराध घडल्यामुळें, त्यांच्या शापानें, उभयतां शमी–मंदार वृक्षयोनीस प्राप्त झाले. ती हकीगत त्यांनीं सर्वांस सांगितली. सर्वांना मोठें दुःख झालें व ते शोक करूं लागले.

विचारांतीं त्यांच्या लक्षांत आलें कीं, श्रीभ्रूशुंडीमहाराज साक्षात् गणेशस्वरूपच आहेत. ते व गणेश दोन नव्हेत. तस्मात् ' गणेशं परिराध्यैव मोचयाव इमावद्यात् ॥' ( श्री. ग. पु. उ. खं. अ. ३५ ) श्रीगणेशप्रभूचें आराधन करून या उभयतांच्या उद्धाराचा प्रयत्न करावा. हेंच यावेळीं अवश्य कर्तव्य आहे. त्या और्व–शौनकांचें तपश्चरण १२ वर्षें झालें. तेव्हां श्रीगणराजप्रभू प्रसन्न होऊन तेथें प्रकट झाले व ' अपेक्षीत वर मागावा ' असें त्यांस म्हणाले. दोघांही मुनींना आनंद झाला; परम कृतार्थता वाटली. त्यांनीं श्रीगणेशास साष्टांग नमन करून यथाविधी पूजा केली आणि अत्यंत भक्तियुक्त अंतःकरणानें, त्यांचें स्तवन केलें; व शेवटीं प्रार्थना केली कीं, '

' और्वस्य सुता देव शामिका नामतः शुभा । मंदराय च सा दत्तावेदशास्त्रार्थ दर्शिने ॥ शौकनकस्य च शिष्याय धौम्यपुत्राय धीमते । उभौ प्रहासिते मोहाद्दृष्ट्वा मार्गे भ्रुशुंडिनं ॥ सच मत्त्वा निजावज्ञां सशाप परथा रुषा । तच्छापाद् वृक्षतां यातौ मंदारः शामिकोऽपि सा ॥ एतयोः कुजतां दूरींकुरु शीघ्रं गजानन ॥ ( ग. पु, उ. अ. ३६ )

और्वमुनीची कन्या शमी, धौम्याचा पुत्र व शौनकाचा शिष्य, जो मंदार, त्याला दिली. उभयतां शमी मंदार मार्गानें जात असतां श्रीभ्रृशुंडीना पाहून अज्ञानानें ते दोघे

हंसले. तो आपला अपमान झाला असें मानून त्यांनीं त्या दोघांस शाप दिला. त्यामुळें तीं दोघें वृक्षरूप झालीं. त्यांना व आम्हां सर्वांनाच ही फार अनिष्टापत्तीच आहे. आतां आपण प्रसन्न होऊन वर देत आहांत तर या शमीमंदाराचें वृक्षरूपत्व नाहींसें करून, त्यांना पूर्वरूपानें संपन्न करावें व अशाप्रकारें आम्हां सर्वांनाच सुखी करावें हीच प्रार्थना आहे.

त्यावर श्रीगणराजप्रभू म्हणाले —

'असंभावि वरं दास्ये कथंविप्रौ कथं वृक्षा ।
करिष्ये भक्तवचनं तस्मात्तुष्टो ब्रुवे वरम् ॥

मुनिश्रेष्ठ हो तुमची प्रार्थना असंभाव्य आहे. माझ्या भक्ताची शापवाणी खोटी कशी करूं ? तस्माद् तुमचे इच्छेप्रमाणें वर देणें अशक्यच आहे. तथापि ज्याअर्थी मी प्रसन्न होऊन आश्वासन दिलें आहे, त्याअर्थी तुमची अपेक्षा जरा वेगळ्या प्रकारें पुरी करतों.

'अद्यप्रभृति मंदारमूले स्थास्यामि निश्चलः । मृत्युलोके स्वर्गलोके मान्योऽयं च भविष्यति ॥

आजपासून मंदारमूलाच्या ठिकाणींच माझें वास्तव्य सुस्थिर होणार आहे. स्वर्ग मृत्यु पाताळादि सर्वत्र लोकांमध्यें वृक्षरूपानेंच हा, सर्वमान्य व सर्वपूज्य होईल.

मंदारस्य च शम्याश्च मूले स्थास्यामि निश्चलः । मद्रूपौ वृक्षजातीनां सर्व वंद्यौ भविष्यतः । दैवास्तौ प्रणमस्यंति किं पुनर्जंतवो मताः । दर्शनात् स्पर्शनाच्चैव पापघ्नौ तौ भविष्यतः । मत्प्रियौ सर्वभावेन देवानां प्रियरूपिणौ । भविष्यतो विशेषेण वृक्षराजौ महामुनी ॥

श्रीगणराजप्रभू सांगतात, मंदार व शमी या वृक्षांच्या मुळाच्या ठिकाणीं मी अक्षय्य वास करीन, इतकेंच नव्हे तर वृक्षजातीमध्यें, हे वृक्ष शमी–मंदार, मत्स्वरूपच ठरणारे असून, सर्वांनाच ते वंद्य होतील. देवादि सुद्धां त्यांना नमस्कार करतील तर मनुष्यांविषयीं काय सांगावें ! तस्मात् सर्वश्रेष्ठ व सर्ववंद्य ठरणाऱ्या त्यांचें तें वृक्षरूपच आतां निकृष्ट कुठें उरलें ? त्याचें दर्शनस्पर्शादि घडल्यानें सर्वांच्या समग्र पापांचा नाशच होणार आहे. इतर ईश्वर-महेश्वरादि सर्वांना ते प्रिय आहेतच. पण मलाही सर्व बाजूंनीं ते विशेष प्रियकर ठरणार आहेत. सारांश, हे वृक्षराज सर्वोत्कृष्ट महात्म्यानेंच संपन्न ठरणार आहेत यांत संशय नाहीं.

शमी मंदरांना वर देऊन श्रीगणराजप्रभू अन्तर्हित झाल्यावर शौनकादि मंडळी सर्वथा कृतार्थ व परमानंदयुक्त होत्साती, आपाल्या स्थळीं निघून गेली.

# —श्रीमौद्‍गल पुराण—

श्वेतार्कश्चापि मंदारो गगनेत्रसमुद्‍भवौ । तुर्यारूपधरौ प्रोक्तौ द्वावेकं रूपधारणात्‌ ।
मंदारनाम्ना ते पुत्रौ जातौ मे शासनान्मुने । अर्कमंदारनाम्ना च ख्यातिं यातु जगत्रये ॥

माझ्या नेत्रापासून उत्पन्न झालेले मत्प्रिय वृक्ष श्वेतार्क मंदार, दोघेही स्वानंदामध्यें दिव्यरूप असून, ते माझ्या सेवेसाठीं अव्याकृत रूपानें, विश्वामध्यें विद्यमान आहेत. त्यांनीं व्याकृतरूपानें माझी सेवा करावी; म्हणून माझ्याच इच्छेला अनुसरून दोघांना एकत्रित स्वरूप, अशाप्रकारें, हे मुनिश्रेष्ठा, धौम्या ! मंदार नांवानें तुझ्या पुत्रत्वाला प्राप्त झालें आहे; असें समज ! आणि याच मुख्य हेतुमत्वामुळें श्वेतार्क वृक्षाला प्राप्त झालेला तुझा पुत्र **मंदार, अर्कमंदार** या विशेष नांवानें सर्वत्र प्रसिद्ध होईल.

मंदारनामा ते पुत्रः श्वेतार्कवृक्षरूपतः । तिष्ठत्वत्रच लोके ऽस्मिन्‌ तस्य मूले वसाम्यहं ॥

अर्थात्‌ तुझा पुत्र मंदार, सांप्रत श्वेतार्कवृक्षाच्या रूपानें संपन्न आहे; आणि श्वेतार्कवृक्षच स्वानंद महिम्यानें संपन्न आँहे. म्हणून श्वेतार्क वा अर्कमंदारवृक्षाच्याच मूलामध्यें माझा वास होईल; आणि तो वृक्षच मला विशेष प्रियकर ठरेल !

बाबांची लीला अगाध आहे. मंदार वृक्षाची माहिती भक्तांकरितां दिली आहे, कारण बाबांची तशी इच्छा ! श्रीमंत रा. आ. तर्खड व त्यांचे मित्र आणि त्या मित्राचें कुटुंब १९१० सालीं शिरडीस गेले तेव्हां बाबा मित्राच्या कुटुंबास म्हणाले; ‘ आई, तूं मला चांगलें चांगलें खाऊं घालीत होतीस, पण मला आतां विसरलीस.’ बाईला आश्चर्य वाटून ती म्हाणाली, ‘ बाबा, मी तर तुम्हांला आतांच पाहातें आहे.’ बाबा म्हणाले, ‘ अग, मी तर तुला लहान होतीस तेव्हांपासून पहातों आहें.’ ह्या गोष्टीचा तिला साहजिक रीतीनें उलगडा होईना. तेव्हां बाबा म्हणाले, ‘ आई, तुझ्या घरीं कोण दैवत आहे ? ’ ती म्हणाली, ‘ गणपती ’ बाबा पुन्हा म्हणाले, ‘ तुझ्या आईच्या घरीं कोण दैवत होतें ? ’ ‘ गणपती ’ तिला स्वाभाविकपणें लहानपणची आठवण होऊन म्हणाली, ‘ बाबा, मीं लहानपणी घरांत आलेल्या जिन्नसांपैकीं उत्तम फुलें, फळें, खारका, बदाम, नारळ वगैरे गणपतीपुढें ठेवीत असें ’ बाबा म्हणाले, ‘ ते सर्व मला मिळत असें आणि तेव्हांपासून मी तुला पाहतों आहें. ’ आणि नंतर म्हणाले, ‘ तुझा गणपती सुरेख मुरत आहे.’ तेव्हां तिला आठवण होऊन ती म्हणाली, बाबा तो उजव्या सोंडेचा आहे आणि त्याचा एक हात मोडलेला आहे. लोक सांगतात अशी मूर्ती घरांत ठेवूं नये. पाण्यांत शिळवावी.’ बाबा म्हणाले, ‘आपल्या मुला–लेकरांचा हात–पाय तुटला तर त्याला आपण बुडवितों का ? तो गणपती लई गुणांचा आहे. त्याची पूजा अर्चा रोज करीत जावी.’

—संपादक

# —शिरडी-वार्ता—

## माहे मार्च १९५२ इ०

या महिन्यांत श्रींचें दर्शनास बाहेरगांवचे बरेच भक्त नेहमीप्रमाणें आले होते.

**देणगी**—या महिन्यांत ४० भक्तांकडून, सोन्या-चांदीचे, कपड्याचे, पितळेचे जिन्नस श्रीसाठीं देणगीदाखल आले.

**धर्मकृत्य**—अभिषेक, अर्चन, पूजा, आरती, नैवेद्य, सुवासिनी ब्राह्मण भोजन व अन्नदान वगैरे विधी नेहमींप्रमाणें झाले.

**कीर्तन**—संस्थान गवई यांचीं फा० शु० ११, श्री तुकाराम-बीज, श्रीएकनाथ षष्ठी, फाल्गुन व ११ व गुढीपाडवा अशीं पांच कीर्तनें या महिन्यांत झालीं.

**नवल विशेष**—रंगपंचमी व गुढीपाडवा या दिवशीं श्रींचे समाधीस मंगलस्नान व गांवांतून रथाची मिरवणूक काढण्यांत आली.

श्री. के. लक्ष्मीनारायण मुंबई, श्री. सूर्यकांत मोहिले, श्री. सीताराम फातरफेकर, श्री. यशवंत केरकर, श्री. मनोहर माशेलकर, श्री. बा. न. बानर्जी, कु. शालिनी बळवंत हबणे, कु० दमयंती वैद्य, जुन्नर, श्री. अनंत द. लिमये ( गंधर्व नाटक मंडळी ), श्री. मनूलाल सांगतकर, तबलजी ( गंधर्व नाटक मंडळी ), वगैरे कलावंतांनीं श्रीपुढें गायन भजन वादन हजेरी दिली.

श्रीसमाधीमंदिराच्या कळसाचें बांधकाम पुरें झालें आहे. आतां नक्षिकाम व गिलावाकाम चालू आहे. नवलकर वाड्याचे व लेंडीबागेंतील बांधकाम चालू आहे.

शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

---

## माहे एप्रिल १९५२ इ.

या महिन्यांत नेहमींप्रमाणें बाहेरगांवचे भक्त श्रीदर्शनास येऊन गेले. रामनवमीचा उत्सव या महिन्यांत आल्यानें भक्तांची विशेष गर्दी झाली होती.

**देणगी**—या महिन्यांत ८६ भक्तांकडून सोन्याचांदीचे, पितळेचे जिन्नस, कापड वगैरे श्री समाधीस देणगी दाखल वस्तू आल्या आहेत. श्री. त्रिंबक दामोदर रासने, अहमदनगर यांनीं चांदीचा पाळणा व रामाची मूर्ति, रेशमी गादी लोड व दोरी सह ( वजन १७५॥ तोळे ) अर्पण केली.

**धर्मकृत्य**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा—आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे विधी रोज यथासांग केले गेले.

**कीर्तन**—संस्थान गवई यांचीं या महिन्यांत चैत्र व. ११, श्री भाऊ कुंभार पुण्यतिथि, श्री अक्कलकोट स्वामी पुण्य० अशीं तीन कीर्तनें झालीं. बाहेरगांवचे कीर्तनकार ह. भ. प. रामदासीबुवा रावेरकर, ह. भ. प. वासुदेवबुवा कोकलेगांवकर, ह. भ. प. अनंत दामोदर आठवले पुणें, श्रीमति इंदिराबाई इंदूरकर यांनीं श्रीपुढें कीर्तन हजेरी दिली.

---

## नवल विशेष –

खालील कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी लाविली.

| नांव. | |
|---|---|
| सौ. चंद्रलेखा राजाध्यक्ष, सायन | गायन |
| श्री. मधुसूदन शंकर सोनवडेकर, मुंबई | ,, |
| श्री. मारुतीराव दोंदेकर, मुंबई | ,, |
| श्री. नारंगीबाई शाळगांवकर, मुंबई | ,, |
| श्री. कौसल्याबाई कोपरगांवकर | ,, |
| कु. कमल | ,, |
| श्री. चंद्रकांत कामत, गोवा | तबला–वादन |
| श्री. हिराबाई बडोदेकर | गायन |
| श्री. शमसुद्दीन खाँसाहेब | तबला–वादन |
| श्री. राजाभाऊ कोस | पेटी–वादन |
| श्री. महंमद हुसेन खाँसाहेब, पुणें | सारंगी वादन |
| श्री. वेणुबाई | गायन |
| श्री. दत्तुपंत | तबला–वादन |
| श्री. बाबू मसेकर | हार्मोनियम |
| श्री. अर्जुन कोळी | संगीत गायन |

निंबवृक्ष पाराखालीं सुंदर छत्री बांधली असून, सुंदर नक्षीकाम केलें आहे. संगमरवरी फरशी बसविली असून दार व चौकट बसविली आहे. बाथरुमजवळील हौदाचें काम पुरें होऊन त्याला तोट्या बसवून त्याचा श्रीरामनवमी उत्सवांत उपयोग करणेंत आला.

कळसाचें काम पुरें होत झालें आहे. शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

सेक्रटरी
**श्रीसाई संस्थान, शिरडी.**

# —श्रीरामनवमी-उत्सव—

श्रीसच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचूडामणि श्रीसाईबाबा महाराज संस्थान शिरडी ता. कोपरगांव, जि. नगर यांचा श्रीरामनवमी उत्सव मि. चैत्र शु. ८ शके १८७४ बुधवार ता. २-४-५२ पासून चैत्र शु १२ सोमवार ता. ७-४-५२ पर्यंत झाला. यंदाचे सालीं एक तिथि वाढल्यानें उत्सव सहा दिवस झाले. या सालीं उत्सवास मुंबई, पुणें, हैद्राबाद, मद्रासप्रांत, म्हैसूर, महाराष्ट्र व इतर प्रांतीय बरेच श्रीसाईभक्त उत्सवास आले होते. भक्तांना राहण्याकरितां शिरडी संस्थानकडून नवीन जागा बांधल्यामुळें, इलेक्ट्रीकचे दिवे, स्नान व धुण्याकरितां बाथरूम्स व हौद बांधल्यामुळें भक्तांची बरीच सोय झाली.

शिरडीग्रामपंचायत कमिटीनें भक्तांकडून यात्रा कर दर माणशीं दोन आणेप्रमाणें वसूल केला.

## —उत्सव-कार्यक्रम—

### चैत्र शु०॥ ८ बुधवार ता. २-४-५२

नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारीं कीर्तन व रात्रौ रेडियोस्टार प्रभाकरपंत राणे, सौ. शकुंतलाबाई याळगी हैद्राबाद यांचें गायन, गोरेगांव भजनी मंडळी ह. भ. प. टंकसाळेबुवा यांचें भजन झालें.

### चैत्र शु० ९ गुरुवार ता० ३-४-५२

रामनवमीचा दिवस, पहांटे ४ वाजतां काकडआरती, श्रीसमाधीवर भक्तांचे पहाटे ५ पासून अभिषेक, पूजा, अर्चन वगैरे झाले. सकाळीं ७ ते ८ पर्यंत श्रीगंगा-गोदावरीच्या कावडींची गांवांतून मिरवणूक होऊन त्यांचें पूजन करून समाधीवर घालण्यांत आल्या. नंतर मंगलस्नान होऊन भक्तांकडून अत्तर गुलाब, पुष्पार्पण, वस्त्रार्पण, फलार्पण करण्यांत आलें. ११ ते १२॥ पर्यंत श्री. ह. भ. प. अनंत दामोदर आठवले वैद्य, पुणें यांचें श्रीरामजन्मोत्सवाचें कीर्तन झालें. नंतर उदीप्रसाद वगैरे देण्यांत आला. दुपारीं श्रींच्या जुन्या कपड्यांचा जाहीर लीलांव झाला. सायंकाळीं निशाणाची मिरवणूक व रात्रौ श्रींची रथांतून मिरवणूक शोभेच्या दारुकामांत व गायन-भजनाच्या प्रचंड गजरांत काढण्यांत आली. नाट्य-मंडळ यांनीं 'श्रीसंत चोखामेळा' नाट्यप्रयोग केला.

### चैत्र शु० ९ शुक्रवार ता० ४-४-५२

नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारीं कीर्तन, सायंकाळीं श्रींच्या कापड वस्तूंचा जाहीर लीलांव झाला. रात्रौ श्री. राममोहन शुक्ल, दादर यांचें गायन तसेंच डॉ० पवार कोल्हापूर, श्री. सरोजिनी दप्तरदार मुंबई यांचें भजन-गायन झालें.

## चैत्र शु० १० शनिवार ता. ५-४-५२

नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त, दुपारीं कीर्तन, सायंकाळीं कापडाचा जाहीर लीलांव, रात्रौ मा० शांताराम कामत मुंबई यांचें संगीत-गायन भजन झालें.

## चैत्र शु० ११ रविवार ता. ६-४-५२

नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त, दुपारीं कीर्तन, सायंकाळीं कापडाचा जाहीर लीलांव, रात्रौ श्रींची पालखींतून मिरवणूक, गारुड वगैरे कार्यक्रम झाले.

## चैत्र शु० १२ सोमवार ता. ७-४-५२

नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त, गोपाळकाला कीर्तन, दही हंडी, तीर्थप्रसाद, दुपारीं प्रसिद्ध मल्लांच्या कुस्त्यांचा ( हगामा ) सायंकाळीं कापडाचा जाहीर लीलांव, याप्रमाणें सहा दिवस उत्सव उत्तम प्रकारें पार पडला

उत्सवांत श्रीचे जन्मोत्सव प्रसंगीं; अहमदनगरचे व्यापारी श्री. त्रिंबक दामोदर रासने यांनीं चांदीचा सुंदर पाळणा, श्रीरामाची सुंदर चांदीची मूर्ति, पाळण्यांत सुंदर रेशमी गादी लोड अर्पण केल्यानें उत्सवांत जास्त शोभा आली; तसेंच श्रीसाईनाथ लाऊड स्पीकर पुणें यांनीं आणून लावल्यानें सर्व कार्यक्रम लांबून ऐकूं येण्यास चांगलीच मदत झाली.

उत्सवांत सरकारी रहाता पोलिस-स्टेशनचे पोलिस अधिकारी व पोलिस-बंदोबस्ता· साठीं मुद्दाम आले होते. त्यामुळें चोऱ्यामाऱ्या वगैरे झाल्या नाहींत. तसेंच श्रीसाई संस्थानतर्फे स्त्री व पुरुष मिळून ३४ जनांचें स्वयंसेवक दल बंदोबस्तासाठीं नेमण्यांत आलें होतें. तसेंच संस्थान कमिटीचे सभासद, ऑ. सेक्रेटरी, ऑ. खजिनदार, मॅनेजिंग ट्रस्टी व प्रेसिडेंट वगैरे जातीनें हजर राहून उत्सवाची व्यवस्था पहात होते. स्वच्छतेकडे जास्त लक्ष दिलें गेलें. पण आलेल्या भक्तांकडून स्वच्छतेच्या बाबतींत विशेष सहकार्य मिळूं शकलें नाहीं. यात्रा सुमारे ५०००० जमली होती.

श्री. शंकरराव ढगे मुंबई, टोप्यांचे व्यापारी यांनीं श्रींच्या जोड्यावर जरीकाम करून त्याखालीं एक मखमली गादीची बैठक सुंदर करून दिली.

उत्सवांत प्रसिद्ध मल्लांच्या कुस्त्या झाल्या, त्यांना बक्षिसें वांटण्याकरितां साईसंस्थान-कडून दोनशें रुपये देण्यांत आले. शोभेची दारू उडविण्यास साईसंस्थानकडून शंभर रुपये देण्यांत आले.

श्रीसाईकृपेनें उत्सव उत्तम प्रकारें पार पडला.

सेक्रेटरी

**श्रीसाई संस्थान, शिरडी**

---

संपादक महाशय यांचे सहकारी नारायण यांचे वडील एक साईभक्त दत्तात्रय पुंडलिक कांदळगांवकर हे आषाढ शु. प्रतिपदा रात्रौ साईचरणीं विलीन झाले. मृता-स्म्यास शांति लाभो ' ह्यामुळें आपणांसर्वांना अंक उशिरा मिळत आहे.

—संपादक

# माहे मे १९५२ इसवी

या महिन्यांत श्रींचे दर्शनास बाहेर गांवचे भक्तलोक नेहमींप्रमाणें येऊन गेले.

**देणगी**—या महिन्यांत ६४ भक्तांकडून श्रीसंस्थानास चांदी-सोनें, कापडी, पितळीचे जिन्नस देणगीदाखल आले. विशेष म्हणजे, श्री. एन् डी. पटेल नाशिक यांनीं चांदीचें तोरण वजन १४० तोळे अर्पण केलें. तसेंच श्री. एस. माणिकलाल सिकंदराबाद यांनीं दोन चांदीचें नंदादीप वजन ४८ तोळे श्रीस अर्पण केलें

**धर्मकृत्य**—अभिषेक, अर्चन, लघुरुद्र, पूजा, आरती, नैवेद्य, ब्राह्मण सुवासिनी भोजन, अन्नदान वगैरे विधी संस्थानतर्फे यथास्थित पार पडले. भक्तांच्या श्रीसत्यनारायणाच्या पूजा वगैरे नेहमींप्रमाणें मंदिरांत करण्यांत आल्या.

**कीर्तन**—संस्थान गवई यांचीं वैशाख शु० ११ व वैशाख व०॥ ११ व नृसिंहजयंति अशीं तीन कीर्तनें श्रीमंदिरांत झालीं.

**नवलविशेष**—खालील कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी लाविली.

| नांव. | |
|---|---|
| श्री. हरि नारायण देशपांडे | गायन |
| श्री. प्रल्हाद दामोदर शास्त्री, पुणें | ,, |
| श्री. बाळकृष्ण शंकर उपाध्ये ,, | फिडलवादन |
| श्री. गोविंद महादेव खटाळे, नगर | हार्मोनियम |
| श्री. अबा तुकाराम माळी ,, | तबला |
| श्री. तुळसाबाई काळे नगर | गायन |
| श्री. सुलोचनाबाई काळे ,, | ,, |
| श्री. शांताबाई जेजुरीकर | ,, |
| श्री. कौसल्याबाई सुपेकर | ,, |
| श्री. मधुकर खाडीलकर, पुणें | सारंगी-वादन |
| श्री. मधुकर ठाणेदार ,, | तबलावादन |
| श्री. वसंतराव देशपांडे, पुणें | गायन |

नवीन बांधकाम सुरू असून, ड्रेनेजचें काम चालू आहे. कळसाचें काम पुरें होत आलें आहे.

शिर्डीची हवापाणी उत्तम आहे.

सेक्रेटरी
**श्रीसाई संस्थान, शिर्डी**

---

यापुढील अंक पुण्यातिथी खास अंक म्हणून काढणार आहोंत तरी, ज्या कोणाला बाबांच्या आठवणी अगर चरित्र विषयक लेख पाठवावयाचे असतील त्यांनी ते २० ऑगस्ट १९५२ च्या आंत संपादकांच्या पत्त्यावर पाठवावे.

**—संपादक**

To,

The Editor,
"SAI LEELA"
Shirdi.

Dear Sir,

I have the pleasure to send you the following for publication.

Yours sincerely,
Hon. Secretary.

## CALCUTTA NEWS

On the 3rd April the Calcutta Sai Bhakta Samaj celebrated Sri Sai Ramanavami by organizing Sri Vishnusahasranama archana in addition to the usual poojah to Sri Baba at the Samaj followed by a special feeding of the poor.

In the evening specil bhajan was organized. Sri D. V. Rajan read Sri Ramanavami day message by H. H. Swami Sivananda Saraswati Maharaj of Ananda Kutir, Rishikesh and gave a discourse on the significance of Sri Ramanavami. H. H. Swami Sri Krishnananda Brahmachari, founder-president, Satyabrata Sangha, Bengal, and his disciples and Sri Pritin Bagchi, Principal, Sangeet Leela, Ballygunge, and his pupils, sang namasankirtans and bhajan songs.

Her Holiness Srimati Aparna Devi of Bhawanipore, H. H. Swami Sri Venkateswarnanda, Editor, Yoga Vedanta Forest University Magazine, Ananda Kutir, Rishikesh, and H. H. Shahin Shah Maharaj of the Shahinshah Asram, Dehra Dun graced the occasion by their presence. The Maharaj discussed the importance of Sri Ramanavami and sang a few devotianal songs.

The function concluded with the distribution of prasad. A special poojah to Sri Baba was organized by the Bangia Sadguru Sar Sammelan at 10-1-52, Sariuhoe Street Balygunge on the occasion.

*Sd/* P. S. Varadaraja Aiyar,
*Hony. Secretary.*

From:-N, L. Heblikar
B. A., B. COM., LL. B.
861, Bhandarkar Institute Road,
Deccan Gymkhana, Poona 4.
May 12, 1952.

My dear Dr, Gawankar,

I will feel very grateful and highly obliged to you if you would kindly publish ' My experiences about the Kindness, Powers and Miracles of Bhagwan Sri Sai Baba of Shirdi ' which I am giving below, in your next issue of the ' Sri Sai Leela ' Quarterly magazine.

It was only in January 1951 that I actually visited Shirdi for the first time, although I had implicit faith in Sri Sai Baba and I had been hearing about HIM for more then 15 years past since my childood. An unusual pose of Sri Babaji's photograph which is generally not to be seen nor sold, was presented to me by uncle, when I was only 15 years of age or so. Since then I had been unconciously offering my prayers with devotion to the same photograph which I am still preserving carefully. Incidentally I might mention that now I am 29 years old and I had been worshipping Sri Sai Baba, without knowing who HE was or from where HE came. Years rolled on like that and as I had strong faith in Sri Sai Baba, I used to be very keen in hearing any news about HIM. As it is a wellknown fact that the Fame of Sri Shirdi Sai Baba is fast spreading in distant places-from Bombay in the North to Madras in the Sonth-the number and strength of devotees is increasing and multiplying in countless numbers, on account of the beneficial expriences that each is getting by having an implicit and self-less faith in the Omnipotent powers of Sri Sai Baba of Shirdi.

Recently many individuals are claiming themselves to be Sri Shirdi Sai Baba's direct disciples and thus attracting large number of people. In this connection I may like to state that I had also occastion to visit such individuals and places. As I had just then, i. e. in 1949 completed my eduational career, I was keen on being fixed up in some good job and I used to visit such individuals and places with the faith that I may be blessed with some good appointment. But to may utter di-appointment, I regret to affirm authoritatively from my personal experience that all my devotional prayers went in vain-and let alone-intead of getting any benefit, on the contrary I got such bad experience of such individuals and places that I was on the point of suffering from a nervous breakdown and I can challange that but for the timely Mercy of Sri Shirdi Sai Baba I would not have recovered from that nasty shock and I would not have been what I am to-day. The shock that I received at those places was so tremendous that I completely lost whatever regard I had in them and my eyes were widely opened and some inner urge in me was trying to rectify my

mistake, namely the greatest blunder I had committed in approaching *other persons* who were claiming themselves as great saints and devotees of Sri Shirdi Sai Baba–instead of going direct to Shirdi, itself the original स्थान place of Sri Sai Baba.

I have been staying in Poon for the last 10 years and Shirdi being so near to Poona, it never stuck me that I should visit Shirdi–because now I realise that Sri Sai Baba of Shirdi did not wish me to go to Shirdi so early but instead HE allowed me to go to distant places in search of HIM and wanted me to undergo some suffering. And as stated earlier, when I received that shock, my time to visit Shirdi had approached very near and now I realise that it was a Blessing in disguise. This is in brief a narration of how I came to visit Shirdi last year in January 1951, for the first time.

Now I wish to write something about the magic effect of my visit to Shirdi. In less then 2 months of my first visit to Shirdi, by Sr Babaji's Kind Grace, I got a good job in Bombay but the greatest wonder of them all was that after working there for only 3 month, I immediately got a Semi-Government Job in Poona itself where I have my house, on a higher salary In this connection I would like to emphasise that though I knew many big and influential persons, inspite of my educational qualifications etc. none of them were of any help to me expect their empty promises.

The very fact that with only one visit to Shirdi, Sri Sai Baba had Blessed me with a good job, strenghened my bonds of faith in HIM and till now I have visited Shirdi with my mother and sister for nearly 5 times. Whenver I get leave, holidays etc. I have always an inclinatiou to go to Shirdi and spend a few days there at the Holy Feet of Sri Sai Baba, where I get complete peace of mind. Every additional visit to Shirdi gives me more happiness and greater peace of mind.

As I am after all an inexperienced layman, I lack in power of expression but all the same I have tried my best to state the facts as experienced by me and I have a great desire that my personal experience about Sri Shirdi Sai Baba's Merciful and Kind Vision on HIS devotees, should be kindly published in the Sri Sai Leela Quarterly magazine of the next issue, for the benefit of all HIS devotees.

I pray our bonds of Faith in Sri Sai Baba of Shirdi must become more and firmer day by day.

OM SRI SHIRDI BABA PRASANNA.

*Yours Faithfully*
N. A. Heblikar

# श्री साईबाबा शिरडी संस्थानांत

## विक्रीकरितां असलेलीं पुस्तकें

| | | किंमत | | |
|---|---|---|---|---|
| | | रु. | आ. | पै |
| १ | श्री साई सच्चरित्र [ मराठी ] .... .... | ७ | ० | ० |
| २ | सच्चरित्र [ इंग्रजी ] ... .... | ४ | ० | ० |
| ३ | दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरी .... | ० | २ | ० |
| ४ | ,, [ अध्याय ४ था ] .... | ० | ८ | ० |
| ५ | सगुणोपासना .... .... .... | ० | ३ | ० |
| ६ | प्रधानकृत पुस्तक [ इंग्रजी ] .... .... | १ | ४ | ० |

वरील पुस्तकाकरितां व बाबांचे विश्वसनीय निरनिराळया साईजच्या फोटो वगैरेकरितां खालील पत्त्यावर लिहावें.

मॅनेजर, **शिरडी संस्थान**, मु. शिरडी, पो. राहातें, जि. **अहमदनगर**

खजिनदार, वि. शा. **कीर्तिकर**, २१३, धन बिल्डिंग, चर्नीरोड, मुंबई नं. ४

---

श्री साईबाबा शिरडी संस्थान कमिटी तर्फे
संपादकः-**डॉ. के. भ. गव्हाणकर** यांनीं काळाचौकी रोड,
मुंबई १२ येथें प्रसिद्ध केलें.